प्रोप्रा.गायसमुद्रे 9527407701 8459953702
एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड , न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701 8459953702
एक वेळ अवश्य भेट द्या

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार ३० जूले २०२४ ● आरएनआय–एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३४८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मिडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक
मो.न.9422660077

# या जनतेच्या प्रेमाला कोणत्याही जाती धर्माची किनार नाही- लोकनेत्या पंकजा मुंडे

## आमदारकी मिळाल्यानंतर पंकजा मुंडेंचं भगवानगडावर भव्य स्वागत अन पेढ्यांनी तुला

विधानपरिषद निवडणुकीत विजयी झाल्यानंतर पंकजा मुंडे या सोमवारी पहिल्यांदाच भगवानगडावर आल्या होत्या. यावेळी भगवानगडावर समर्थकांनी त्यांचे भव्य स्वागत केले. यावेळी पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसाचा केक कापण्यासोबत त्यांची पेढ्यांनी तुला करण्यात आली. पंकजा मुंडे यांनी यावेळी आपल्या समर्थकांशी संवाद साधला. त्यांनी म्हटले की, माझं आणि तुमचे नाते हे भगवान बाबा आणि माझे जे नाते आहे, तसेच असल्याचे पंकजा मुंडे यांनी सांगितले. मी आज तुम्हाला फक्त भगवान बाबांसाठी फुले आणायला सांगितली होती. तुम्ही माझ्याविषयी जे प्रेम दाखवत आहात, त्याला कोणत्याही



जातीधर्माची किनार नाही. मी मुंडे साहेबांनी वचन दिले होते, मी थकणार नाही, रुकणार नाही. मोडेन पण वाकणार नाही. तुम्हाला वाटतंय की, फार मोठे युद्ध जिंकले आहे. पण मोठी लढाई आणखी बाकी आहे. माझ्या मंचासमोर माणसे नसावेत तो दिवस मला पाहायला मिळू नये. विधानपरिषदेची आमदारकी हा माझ्यासाठी सन्मान आहे, असे पंकजा मुंडे यांनी सांगितले.

### अहंकाराचे भांडण सोडा, एकजूट व्हा

यावेळी पंकजा मुंडे यांनी आपल्या समर्थकांना महत्त्वाचे आवाहन केले. अहंकाराचे, पदाचे भांडण सोडा आणि एकजूट व्हा. एक वर्ष एकजुटीने घ्या. बीड जिल्ह्याने इतिहास घडवला आहे. मला तुमच्याकडूनही वचन हवे आहे. तुम्ही एकजूट राहण्याचे वचन द्या. काय करायचं आणि काय करायचं नाही याच भान ठेवा. आपल्याला काही कमी पडणार नाही, असा सल्ला पंकजा मुंडे यांनी आपल्या समर्थकांना दिला.



### विधानपरिषद निवडणुकीत पंकजा मुंडेंचा विजय

तब्बल पाच वर्षांनी पंकजा मुंडे यांच्या भाळी विजयाचा गुलाल लागला आहे. २०१९ मधील विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर राज्यसभा आणि विधानपरिषदेची प्रत्येकी निवडणूक आली की, भाजपकडून पंकजा मुंडे यांच्या उमेदवारीची चर्चा व्हायची. मात्र, त्यांचे राजकीय पुनर्वसन कधीच झाले नाही. लोकसभा निवडणुकीत पक्षाने त्यांना संधी दिली, पण मराठा फॅक्टरने त्यांना बालेकिल्ल्यातच पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे पंकजा मुंडे यांचे समर्थक प्रचंड हताश झाले होते. या सर्वांना पंकजा मुंडे यांच्या विधानपरिषद निवडणुकीतील विजयाने नवी उभारी मिळाली आहे. यानिमित्ताने पंकजा मुंडे यांची महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एन्ट्री झाली आहे हे तितकेच खरे.

# आरोपींना पाठीशी घालणाऱ्या केतन राठोड व सोनटक्के यांना ताबडतोब निलंबित करा

## एकल महिला संघटनेची एस.पी.कडे मागणी

**बीड : प्रतिनिधी**

आरोपींना तात्काळ अटक करा व आरोपींना पाठीशी घालणाऱ्या केतन राठोड व सोनटक्के यांना ताबडतोब निलंबित करण्यात यावे एकल महिला संघटना ची मागणी शाळकरी मुलीवर झालेल्या अत्याचार बाबत आज बीड येथील कलेक्टर ऑफिस व पोलिस अधीक्षक कार्यलय आज दि .२९/०७/२०२४रोजी एकल महिला संघटना बीड च्या वतीने निवेदन देण्यात आले. एकल महिला संघटना ही महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व कौटूंबिक हिंसाचार व संपत्ती अधिकार या मुद्द्यावर मराठवाड्यात काम करत आहे हिंसेचे प्रमाण वाढत आहे, याला आळा घालण्यासाठी अनेक कायदे आहेत परंतु अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कठोर पाऊल उचलले पाहिजे जसे महिला बाल कल्याण समिती, तंटामुक्त समिती आहे, व पोलीस पाटील, ग्रामपंचायत ची मुख्य समिती, ग्रामीण भागातील ग्रामपंचायत पातळीवर यांना याबाबत प्रशिक्षण देण्यात यावे तसेच गावात समुपदेशन केंद्र असावे जेणे करून गावातील दारूचे व्यसनामुळे गावातील वाद मिटवण्यासाठी



मदत होईल, बाल विवाह होणार नाही, दर महिन्याला समितीच्या माध्यमातून बैठका होणे बंधनकारक करण्यात यावे तसेच गावातील बालविवाह, महिला युवक व युवती याचे जनजागृती करण्यासाठी उपक्रम राबविण्यात यावे. संघटना च्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला असून संघटनाने खालील मागण्या करण्यात आल्या. लवकरात लवकर मुख्य आरोपींना अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी. आरोपींना पाठीशी घालणाऱ्या पोलीस केतन राठोड व सोनटक्के यांना तात्काळ निलंबित करावे. तर पीडित मुलीच्या कुटुंबाला आरोपी पासून धोका आहे यासाठी पोलीस संरक्षण मिळावे. पीडित मुलीला न्याय देऊन नुकसान भरपाई मिळावी. अतिथी लॉज यांचा परवाना रद्द करावा व हॉटेल च्या मालकाला सहआरोपी करण्यात यावे. यावेळी एकल महिला संघटनाच्या बीड जिल्ह्यातील तारा घोडके, लता सावंत, मोहिनी बाबर, अनिता ढोरमारे, शिल्पा साबळे, मंगल कानडे, रुक्मिणी नागापुरे, प्रजावती जोगदंड, शारदा सोनवणे, उजवला खंडागळे, कौशल्या कळसुले, शिल्पा पंडित, संगिता मेटे, चित्रा पाटील, आशालता पांडे दुर्गा गवळी आदी महिला उपस्थित होत्या.

# धानोरा रोडच्या दुरावस्थे संदर्भात नितेश उपाध्ये यांचे आमरण उपोषण

## उपोषणाची दखल न घेतल्यास १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी आत्मदहनाचा इशारा



बीड (प्रतिनिधी) गेल्या सहा ते सात वर्षांपासून बीड शहरातील नगर रोड पासून जाणाऱ्या धानोरा रोडची अत्यंत दुरावस्था झाली आहे या धानोरा रोड परिसरात जवळपास 15 ते 20 हजार लोक वस्ती आहे तसेच या परिसरात चार शैक्षणिक संस्था असुन या शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या हजारावर आहे त्यामुळे या रस्त्यावर नेहमीच वर्दळ असते सध्या पावसाळा सुरू झाला असून या रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यामध्ये पाणी साचत आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जात असताना अक्षरशा गुडघाभर पाण्यातून जावे लागते तसेच या रोडलगत असलेल्या व्यापाऱ्यांना याचा आर्थिक फटका बसत आहे मात्र याकडे प्रशासन साप दुर्लक्ष करत असल्यामुळे सोमवार दि. 29/7/2024 पासून नितेश उपाध्ये हे आमरण उपोषणाला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बसले असून या उपोषणाची दखल प्रशासनाने घेतली नाही तर दि. 15 ऑगस्ट 2024 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करणार असल्याचे त्यांनी निवेदनात म्हंटले आहे.

# राडीतील शाळेत दिड महिन्यापासून गणिताचा शिक्षक नाही ; विद्यार्थ्यांचं भवितव्य अंधारात

## गणिताचे शिक्षक द्या; राडीच्या विद्यार्थ्यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात भरवली शाळा




**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शालेय शिक्षण विभाग मोठ्या प्रमाणात उपाययोजना करीत असताना अंबाजोगाई तालुक्यात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गेल्या दिड महिन्यापासून राडी येथील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळेत गणिताचा शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचं भवितव्य अंधारात गेले आहे. वेळोवेळी मागणी, निवेदने, पत्रव्यवहार करून देखील गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने या विद्यार्थ्यांकडे ढुंकूनही पाहिले नाही. अखेर विद्यार्थ्यांचा आणि राडी गावातील ग्रामस्थांचा संयम तूटला आणि थेट त्यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालय गाठले. व आठवड्याच्या पहिल्याच दिवशी म्हणजे दि.२९ जुलै सोमवार रोजी राडी येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील विद्यार्थी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात शाळा भरवीत धडे गिरवू लागले. दरम्यान, शाळेतील विद्यार्थी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात आल्याने कार्यालयातील कर्मचाऱ्यांची चांगलीच धावपळ झाली. तब्बल तीन ते चार तास विद्यार्थी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात गणिताच्या शिक्षकासाठी तळ ठोकून होते. कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दिले आश्वासन

राडी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात शाळा भरवली असता कार्यालयातील अधिकाऱ्यांनी विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधला. विद्यार्थी आणि पालकांची मागणी तात्काळ बीड येथील शिक्षणाधिकारी कार्यालयाला कळविण्यात येईल आणि तातडीने शाळेतशाळेत गणिताचा शिक्षक देण्यात येईल, असे आश्वासन विद्यार्थी आणि पालकांना गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आले. यावेळी विद्यार्थी आणि पालकांनी गटशिक्षणाधिकारी यांना लेखी निवेदनही दिले. आश्वासनानंतर विद्यार्थी परत दुपारी राडी गावातील शाळेकडे रवाना झाले.

## शिक्षकाकडून लाच स्वीकारताना मुख्याध्यापक जाळ्यात

**गेवराई/प्रतिनिधी** बीड जिल्ह्यामध्ये लाचखोरीच्या घटना काही केल्या थांबताना दिसत नाहीये शुक्रवार रोजीच गेवराई मध्ये लाच स्वीकारणाऱ्या तांत्रिक सहाय्यकावर छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत विभागाने कारवाई केली होती त्यानंतर चौथ्याच दिवशी गेवराई मध्ये पुन्हा लचखोरीची घटना समोर आलीये वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देण्यासाठी शिक्षकालाच मुख्याध्यापकाकडुन लाचेची मागणी करण्यात आली होती.त्यासाठी दोन हजार सातशे रुपयांची लाच स्वीकारताना मुख्याध्यापकाला बीड लाचलुचपत विभागाने रंगेहाथ पकडले आहे.भारत शेषराव येडे ( वय - ५७ रा.आश्रम शाळेच्या बाजुला शिक्षक कॉलनी गेवराई ) असं लाचखोर मुख्याध्यापकाचं नाव असून मुख्याध्यापक येडे हे मन्यारवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत होते.या कारवाईने शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून.याबाबत गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याचे काम सुरू आहे.तक्रारदार शिक्षक यांचे वरीष्ठ श्रेणीचे बिल तयार करून मंजूर करण्यासाठी दहा टक्के प्रमाणे 2700 रुपये लाचेची मागणी पंचाक्षम केली होती.हीच लाचेची रक्कम स्वीकारताना मुख्याध्यापक भारत येडे यांना रंगेहाथ पकडण्यात आले. सदरील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथील पोलिस उपाधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक युनुस शेख, गुलाब बाचेवाड, पोलीस हवालदार सुरेश सांगळे , भारत गारदे, अविनाश गवळी, अंबादास पुरी, गणेश म्हेत्रे यांनी केली.

## बीड जिल्ह्यात सततचा पाऊस व सुर्यप्रकाशा अभावी खरीपाची पिके वाया तात्काळ पंचनामे करा विमा कंपनीकडुन नैसर्गिक आपत्ती म्हणुन भरपाई द्या-भाई घोलप

**पाटोदा/प्रतिनिधी**

बीड जिल्ह्या सोबतच पाटोदा तालुक्यात गेल्या दोन महिन्यात फक्त आठ पंधरा दिवस वगळता रोजच पावसाची हजेरी असल्याने खरीप पिकाची वाढ खुंटली असून पिके पूर्णपणे वाया गेली आहे यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे याची जाण ठेवून बीड जिल्ह्य प्रशासनाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्याच्या गेलेल्या पिकाचा पंचनामा करून शेतकऱ्यावर नैसर्गिक आपत्ती ओढावली असल्याने शेतकऱ्यांना विमा सोबतच आर्थिक मदत मिळवून द्यावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री पालकमंत्री तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी कामगार पक्षाचे भाई विष्णुपंत घोलप यांनी केली आहे . दिलेल्या मागणीच्या निवेदनात म्हटले आहे की बीड जिल्ह्यात २०२४-२५ च्या खरीप हंगामाची पेरणी जुनचा दुसरा पंधरवाडा आणि जुलैच्या पहिल्या आठवड्यात जवळपास पुर्ण झाल्या आहेत. त्यानंतर सतत गेल्या २० दिवसापासुन म्हणजे जवळपास तीन आठवडे सतत काही ठिकाणी रिमझीम तर काही ठिकाणी मोठा पाऊस पडला खरीपाचे पिक उगवल्यानंतर मागील तब्बल एक महिन्यापासून बीड जिल्ह्यात विशेषता पाटोदा तालुक्यात सुर्यदर्शन झाले नाही त्यामुळे पिकाची वाढ खुंटली, काही ठिकाणी रोजच्याच पावसाने राहणे उफाळली चिवडलीअसून पेरलेल्या पिकात पाणी साचले व वाहत असल्याने पाणी जास्त झाल्यामुळे पिकाची मुळे सडली तसेच पिक पिवळी पडली असून रोजच्या ढगाळ वातावरणाने तसेच रोजच्याच पावसाने पिकावर रोगराई वाढली त्यामुळे बीड जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांना ह्या नुकसानीचा फटका बसला असुन त्या शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत करणे गरजेचे आहे. त्यासाठी मा.जिल्हाधिकारी साहेबांनी तात्काळ कृषीविभाग,महसुल आणि विमा कंपनी यांना पंचनाम्याचे आदेश देऊन शेतकऱ्यांना संकटातुन वाचवावे. ई-पीक पाहणीचे सर्व्हर हे १ ऑगस्ट पासून सुरु होणार आहे असे प्रशासनाच्या वतीने मागिल काही दिवसापुर्वी शेतकऱ्यांना कळविले आहे.

नुकसानीसाठी पाटोदा तालुक्याच्या सर्वच भागात खरीप पिकाचे नुकसान झालेले असुन आपण प्रशासनाला पंचनाम्याचे तात्काळ आदेश दिल्यास बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खरीप पिकाच्या नुकसानीचा अंदाज येईल असे लेखी निवेदनाव्दारे उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा मार्फत जिल्हाधिकारी बीड यांना भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी कळविले आहे. माहितीस्तव राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री धनंजय मुंडे व शेकापचे सरचिटणीस आ.भाई जयंत पाटील आणि बीड जिल्ह्याचे खासदास मा.बजरंग(बप्पा) सोनवणे यांना दिले आहे.

## शिक्षकाकडून लाच स्वीकारताना मुख्याध्यापक जाळ्यात

**उरण/विठ्ठल ममताबादे**

भारतातील महत्त्वाची संघटना म्हणून सुपरिचित असलेले,फुले, शाहु, आंबेडकर विचार धारेवर चालणारी जगभरात कार्यरत असणारी संघटना म्हणजे जिजाऊ ब्रिग्रेड. जिजाऊ ब्रिगेड च्या राष्ट्रीय अध्यक्षा सिमाताई बोके यांच्या आदेशा नुसार व रायगड जिल्ह्या-अध्यक्षा रेवतीताई कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका अलिबाग महिलांच्या वतीने श्री समर्थ कृपा वृध्दधाम परहुर पाडा अलिबाग या आश्रमाला व तेथील वृद्धांना फ्रूट व वस्तू वाटप करण्याचा उपक्रम जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने राबविण्यात आला. अँड. जयेंद्र गुंजाळ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कार्यकर्त्या प्राची भगत - तालुका अध्यक्षा ,कोमल नाईक - उपाध्यक्षा, कल्पना चव्हाण - सचिव,सायली राउळ - खजिनदार,प्रतिमा सावंत - सल्लागार, अंजली गुरव- सल्लागार, सवीता पाटील, प्रियंका सावंत, सुरेखा जाधव,वृषाली जांभळे व इत्यादी शेकडो कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

## जिजाऊ ब्रिगेड महिलांनी दिली श्री समर्थ कृपा वृध्दधाम आश्रमाला भेट.

**उरण/विठ्ठल ममताबादे**

भारतातील महत्त्वाची संघटना म्हणून सुपरिचित असलेले,फुले, शाहु, आंबेडकर विचार धारेवर चालणारी जगभरात कार्यरत असणारी संघटना म्हणजे जिजाऊ ब्रिग्रेड. जिजाऊ ब्रिगेड च्या राष्ट्रीय अध्यक्षा सिमाताई बोके यांच्या आदेशा नुसार व रायगड जिल्ह्या-अध्यक्षा रेवतीताई कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका अलिबाग महिलांच्या वतीने श्री समर्थ कृपा वृध्दधाम परहुर पाडा अलिबाग या आश्रमाला व तेथील वृद्धांना फ्रूट व वस्तू वाटप करण्याचा उपक्रम जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने राबविण्यात आला. अँड. जयेंद्र गुंजाळ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कार्यकर्त्या प्राची भगत - तालुका अध्यक्षा ,कोमल नाईक - उपाध्यक्षा, कल्पना चव्हाण - सचिव,सायली राउळ - खजिनदार,प्रतिमा सावंत - सल्लागार, अंजली गुरव- सल्लागार, सवीता पाटील, प्रियंका सावंत, सुरेखा जाधव,वृषाली जांभळे व इत्यादी शेकडो कार्यकर्त्या उपस्थित होत्या.



## जालना जिल्ह्यात उद्योग उभारणीसाठी उद्योजकांना जिल्हा प्रशासनाचे सर्व सहकार्य-जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

**जालना/प्रतिनिधी**

नवउद्योजकांना उद्योग उभारणीसाठी जालना जिल्ह्यात पोषक वातावरण आहे. प्रमुख शहरांना जोडणारे रस्ते, रेल्वे मार्ग, समृध्दी महामार्ग यासारख्या वाहतुकीच्या सुविधांसह इतर पायाभूत सुविधा जिल्हयात उपलब्ध असल्याने उद्योजकांनी आपला उद्योग या जिल्ह्यात अवश्य उभारावा, यासाठी जिल्हा प्रशासनाचे उद्योजकांना सर्व सहकार्य राहिल, अशी ग्वाही जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली. सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग (MSME) क्षेत्रासंदर्भात राज्य व केंद्र शासनाची धोरणे व उपक्रम याबाबत जागरुकता वाढविण्यासाठी उद्योजक व निर्यातदार यांच्याकरीता आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवन येथे इग्नाइट महाराष्ट्र कार्यशाळा (IGNITE MAHARASHTRA-202) संपन्न झाली. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. कार्यशाळेस अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार, छत्रपती संभाजीनगर विभागाचे उद्योग सहसंचालक बी.टी. यशवंते, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर, सिंगल विंडोचे (मैत्री) अधिकारी प्रदीप दळवी, सिडबीचे व्यवस्थापकीय अधिकारी मनोज कुमार सहयोगी, जालन्याचे पोस्टमास्टर संदिप महाजन, आयडीबीयचे उपव्यवस्थापक मिलिंद काळे, निर्यात तज्ञ अमोल मोहिते, विमा सल्लागार आनंद अमृतकर आदी उपस्थित होते. यावेळी उद्योजक, औद्योगिक संघटनेचे पदाधिकारी, नवउद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, जालना हा कृषी प्रधान जिल्हा आहे. यासह हा जिल्हा स्टील, बियाणे उद्योगांसाठी प्रसिध्द आहे. आता हा जिल्हा रेशीम




उद्योगासाठीही नावारुपाला येत आहे. एकंदरीत जिल्ह्यात उद्योगासाठी अतिशय सकारात्मक पोषक वातावरण असल्याने नवउद्योजकांसाठी उद्योग उभारणीकरीता येथे चांगली संधी आहे. उद्योजकांना जिल्हा प्रशासनाचे संपूर्ण सहकार्य राहिल. उद्योग विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा उद्योजकांना प्राधान्याने लाभ दिला जाईल. सध्या जालन्याचा औद्योगिक विकास पाहता येत्या काळात हे शहर मोठे औद्योगिक शहर म्हणून नक्कीच ओळखले जाईल. श्रीमती मैत्रेवार यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेबद्दल माहिती दिली. या योजनेच्या माध्यमातून बेरोजगार युवक-युवतींना विविध आस्थापनेवर प्रशिक्षणाची संधी मिळणार असल्याने योजनेत सहभागी होण्यासाठी उमेदवारांनी नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. श्री. बी.टी. यशवंते यांनी सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग क्षेत्रासंदर्भात राज्य व केंद्र शासनाची धोरणे व उपक्रम तसेच उद्योग विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. श्री. दळवी यांनी उद्योग उभारणीसाठी लागणाऱ्या विविध परवानग्या कशा मिळवाव्यात त्यासाठी असणाऱ्या सिंगल विंडो (मैत्री) पध्दतीतबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. श्री. काळे यांनी बँकिंग फायनान्स, श्री. मोहिते यांनी निर्यात, श्री. अमृतकर यांनी उद्योगासाठी असणारा विमा, श्री. सहयोगी यांनी सिडबीचे कार्य तर श्री. महाजन यांनी टपाल कार्यालयामार्फत करण्यात येणाऱ्या मालाचे वाहतूक व्यवस्थापन याविषयी आणि श्री. सारणीकर यांनी जालना जिल्हयातील औद्योगिक विकास व सुविधांबद्दल सादरकरणाद्वारे माहिती दिली.

# प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने दि. ५ ऑगस्ट रोजी वृक्षारोपण व भव्य वृक्षदिंडीचे आयोजन

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ व सह्याद्री देवराई यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध सिनेअभिनेते तथा वृक्षमित्र सयाजी शिंदे, सुप्रसिद्ध सिने लेखक अरविंद जगताप यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये जागतिक पर्यावरण दिनी सिने अभिनेते सयाजी शिंदे व सुप्रसिद्ध सिनेलेखक अरविंद जगताप यांच्या उपस्थितीत दि.५ ऑगस्ट रोजी अंबाजोगाई शहरात भव्य वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे. पर्यावरण दिनानिमित्त सिनेअभिनेते सयाजी शिंदे हे शहरातील विद्यार्थ्यांसोबत वृक्षसंवाद साधत विद्यार्थ्यांवर बीजसंस्कार करत विविध वृक्षांची ओळख त्यांना करुन देणार आहेत. आज देशात ३३% जंगलाची आवश्यकता असतांना केवळ ३%जंगल किंवा वृक्ष आहेत. त्यामुळेच निसर्गात ग्लोबल वॉर्मिंग होऊन पर्जन्यमान मोठया प्रमाणावर घटले असल्याचे प्रसिद्धी पत्रकात मोदी यांनी सांगितले. वृक्ष वाढले तरच निसर्गाचा समतोल राखला जाईल. जल ही जीवन हें यामुळे सर्वांनी वृक्षारोपण करावे तसेच अंबाजोगाई शहरातील सर्व शाळा, महाविद्यालये,स्वयंसेवी संस्था यांनी सहभागी व्हावे असे अवाहन राजकिशोर मोदी यांनी केले.



सयाजी शिंदे यांच्या सह्याद्री देवराई अंतर्गत व प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने भव्य वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या वृक्षदिंडीमध्ये शहरातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांना घेऊन वृक्षदिंडी सकाळी ९:३० ते दुपारी २ वाजेपर्यंत निघणार आहे. या वृक्षदिंडीमध्ये सुमारे ४० हजार वृक्ष तथा वृक्षांच्या बिया देण्यात येणार आहेत. या बीजांचे बीजारोपण विद्यार्थ्यांसह प्रत्येकांनी आपापल्या घरी करावयाचे आहे. या बिजातून उगवलेल्या झाडाचे संवर्धन व संगोपन करण्यासाठी त्यांना जागरुक करण्यात येणार आहे.

कार्यक्रमासाठी सिनेअभिनेते सयाजी शिंदे , सिने लेखक तथा चला हवा येऊ द्या फेम अरविंद जगताप , राजकिशोर मोदी, सह्याद्री देवराईचे जिल्हा समन्वयक कृषिभूषण शिवराम घोडके यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे राजकिशोर मोदी, दिनकर जोशी, संकेत मोदी, प्रा.चंद्रकांत गायकवाड, विशाल जगताप, सचिन जाधव यांच्या वतीने जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# अंबाजोगाईत ३१ जुलै रोजी स्वर सुमनांजली कार्यक्रमाचे आयोजन
# स्वर्गीय मोहम्मद रफी स्व.किशोर कुमार व स्व. मुकेश यांच्या स्मृतीत आयोजन

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

कलाकार कट्टा,अंबाजोगाई प्रस्तुत स्व. मोहम्मद रफी, स्व. किशोरकुमार व स्व. मुकेश यांच्या स्मृतीत 'वो जब याद आए बहुत याद आए' स्वरसुमनांजली कार्यक्रम दि.३१ जुलै २४ रोजी सायं. ६ वा.बाळशास्त्री जांभेकर पत्रकार भवन, नगर परिषद अंबाजोगाई आयोजित करण्यात आला आहे. रसिक मंडळ अंबाजोगाई, वसुंधरा सेवा प्रतिष्ठान व मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम संपन्न होत असून या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे, गटविकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने काळे, पुरवठा अधिकारी मिलिंदजी गायकवाड, संजय



गंभीरे, मा.नगराध्यक्ष महादू मस्के व अध्यक्षस्थानी जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा यांची उपस्थिती असणार आहे. या स्वरसमनांजली कार्यक्रमांमध्ये स्वर्गीय रफी साहेब स्वर्गीय मुकेश जी व स्वर्गीय किशोर कुमार यांची सदाबहार गाणी अंबाजोगाई येथील सर्व कलावंत सादर करणार असून यानिमित्ताने अनेक नव्या जुन्या कलावंतांना व्यासपीठ निर्माण होणार आहे. अंबाजोगाई व परिसरातील शालेय महाविद्यालयीन व विविध व्यवसायामध्ये कार्यरत असणाऱ्या इच्छुक कलावंतांसाठी कलाकार कट्टा व रसिक मंडळ सदैव कार्यरत असणार असून या निमित्ताने अनेक कलावंतांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असणार आहे. दि.३१ जुलै रोजी आयोजित केलेल्या स्वर सुमनांजली या कार्यक्रमासाठी सर्व कलावंत रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन कलाकार कट्टा चे संस्थापक अध्यक्ष तालमार्तंड प्रकाश बोरगावकर,रसिक मंडळाचे अध्यक्ष डॉ.श्रीनिवास रेड्डी, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष दत्ता आंबेकर, गजानन मुडेगावकर,सूत्रसंचालन परमेश्वर गीते, तुकाराम सुवर्णकार, अभय जोशी, अनंत आरसुडे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## यह वादा रहा या करावके सिंगिग शो मध्ये सिंगर शर्मिला केसरकर



अंबरनाथ(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)-अंबरनाथकर संगीतप्रेमींसाठी मोहन पुरम कॉप्लेक्स,कानसाई सेक्शन,मोहन पुरम कम्युनिटी हॉल,अंबरनाथ(पुर्व) येथे"यह वादा रहा"हा करावके सिंगिग शो नुकताच आयोजित केला होता. या संगितमय कार्यक्रमात जेष्ठ गायिका शर्मिला केसरकर यांनी आपल्या सुमधूर आवाजात गाणी पेश करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.तसेच यावेळी आयोजकांनी सामाजिक क्षेत्रात कार्य करणा-या जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर,कल्याण-कसारा-कर्जत महिला रेल्वे प्रवासी संघटनेच्या महिला संघटक सौ.रेखा अत्तरदे,गायिका शर्मिला केसरकर तसेच इतर मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला.तसेच गेस्ट सिंगर शर्मिला केसरकर यांनीही आयोजकांचाही भेटवस्तू देऊन सत्कार केला.शेवटी सिंगर इंद्रनिल यांनी सर्वांचे आभार मानले.

# जि.प. पिठ्ठी शाळेत स्नेहभोजन, वृक्षारोपण

प्रतिनिधी । पाटोदा

दि.२८ शासनाच्या आदेशानुसार सर्वत्र शैक्षणिक सप्ताह साजरा केला जात आहे, आज सप्ताहाचा शेवटचा दिवस असल्याने वरिष्ठ स्तरावरून व बीड जि.प.चे कर्तव्य दक्ष शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी यांचे आदेशावरुन तसेच बीड जि.प.चे उपशिक्षणाधिकारी शेळके ऋषीकेश, गटशिक्षणाधिकारी धनंजय बोंदार्डे यांचे मार्गदर्शनाखाली जि.प.प्रा. पिठ्ठी शाळेत शिरा, भात, कडीचा समावेश असलेले गोड जेवण बालकांना देण्यात आले. शंभर बालकांनी या जेवणाचा आस्वाद घेतला. जेवणापूर्वी कविता गायन, गीतांच्या भेंड्या, इंग्रजी शब्दांच्या भेंड्या घेण्यांत आल्या एकंदरीत शालेय वातावरण शिक्षणमय होवून गेले. विद्यार्थी प्रत्येक कृतीत उत्साहाने सहभागी होत होते. स्नेह भोजनानंतर शालेय परिसरात वृक्षरोपनाचा कार्यक्रम घेण्यात आला. शालेय परिसरात विद्यार्थ्यांच्या सहकार्याने



सत्तर झाडांची लागवड केली. यावेळी शालेय शिक्षण समिती अध्यक्ष नानासाहेब कवठेकर, सरपंच प्रभाकर कवठेकर, शाळेचे मुख्याध्यापक मच्छिंद्र राख, शिंदे पी.आर. केंद्रप्रमुख शाळेतील सहकारी शिक्षक भोसले, खाडे, शिक्षीका श्रीमती वर्षा फाटे, उज्वला कुलकर्णी, रोहिणी घाडगे, चित्तरंगा राऊत, शारदा जाधव, पोषण आहार कर्मचारी श्रीमती चंद्रकला कुडके, प्रकाश कुडके उपस्थित होते.

## शांती ब्रह्म एकनाथ महाराजांच्या पालखीला निरोप...

**शिरूर कासार/प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र पैठण येथील पंढरपूरला गेलेली शांती ब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांची पालखी परतीच्या मार्गावर असून आज रविवार दि.२८ रोजी शिरूर कासार तालुक्यातील घाटशिळ पारगाव येथे आली असताना ग्रामस्थांनी टाळ मृदंगाच्या गजरामध्ये पालखीचे स्वागत केले, पालखीला मानाचा नैवेद्य दाखवण्यात आला. दर्शन सोहळा पार पडल्यानंतर वारकऱ्यांना महाप्रसाद



वाटप करण्यात आला त्यानंतर पालखीचे पैठण कडे प्रयाण झाले ग्रामस्थांनी मोठ्या भक्ती भावाने पालखीला निरोप दिला. दोन मुक्कामानंतर बुधवार दिनांक ३१ एकादशीच्या दिवशी पालखी पैठण येथे पोहोचणार असल्याचे नाथवंशज श्री ह भ प रघुनाथबुवा गोसावी यांनी सांगितले.

# कर्मचारी उतरले रस्त्यावर; जुन्या पेन्शनसाठी घातले दंडवत !

**पालघर/प्रतिनिधी**

'राज्यातील सरकारी-निमसरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जुनी पेन्शन योजना तात्काळ लागू करा,' या मागणीसाठी जिल्ह्यातील हजारो कर्मचाऱ्यांनी आज भर पावसात, रस्त्यावर दंडवत आंदोलन केले. यावेळी 'एकच मिशन-जुनी पेन्शन, व्होट फॉर ओपीएस' यासारख्या घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून गेला होता. आंदोलनात जिल्ह्यातील सर्वच कर्मचारी संघटना आंदोलनात उतरल्याचे चित्र दिसत होते. महिला आंदोलनकर्त्यांची संख्या लक्षणीय होती. विशेष म्हणजे ज्यांना जुनी पेन्शन योजना लागू आहे; असेही शेकडो कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले होते. हे आंदोलन जिल्हाध्यक्ष लक्ष्मण नणवरे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या पालघर जिल्हा शाखेने आयोजित केले होते. आंदोलनाची सुरुवात स तू कदम विद्यालय येथून करण्यात आली. तर जिल्हाधिकारी कार्यालय येथे सांगता करण्यात आली. आंदोलकांच्या शिष्टमंडळाने आपल्या मागणीचे एंनिवेदन मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत मा. मुख्यमंत्र्यांना दिले. सविस्तर वृत्त असे, की शासन सेवेत दि. १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी



पेन्शन योजना पूर्ववत लागू करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेद्वारा मागील अनेक वर्षापासून विविध आंदोलने करून केली जात आहे. मात्र राज्य सरकार केवळ वेळकाढूपणाचे धोरण स्वीकारत आहे. त्यामुळे राज्यातील दि. १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर शासन सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये कमालीचा असंतोष निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे. याचाच परिपाक म्हणून जिल्ह्यातील हजारो कर्मचारी 'दंडवत / लोटांगण आंदोलन' करून अनोख्या पद्धतीने सरकारचे लक्ष्य वेधणार असल्याचे प्रसिद्धीपत्रक संघटनेने जाहीर केले होते. त्यानुसार हे आंदोलन करण्यात आले. प्रस्तावित जी. पी. एस. योजनेला विरोध

दरम्यान महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेने केलेल्या पाठपुराव्यामुळे सरकारने गठित केलेल्या जुनी पेन्शन समितीचा अहवाल जाहीर झाला असून समितीने जीपीएस नावाची नवीन पेन्शन योजना प्रस्तावित केली आहे. सदर जीपीएस योजनेचे स्वरूप हे एन पी एस योजने सारखेच फसवे असल्याचे प्रथमदर्शिनी लक्षात येत आहे. त्यामुळे सर्व एन पी एस ग्रस्त कर्मचारी याचा निषेध व्यक्त करीत आहेत.

आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे राज्य कोषाध्यक्ष प्रवीण बडे, राज्य प्रतिनिधी नितिन तिडोळे, समन्वयक संभाजी पोळ, दत्ता मदने, जिल्हा अध्यक्ष लक्ष्मण ननवरे, उपाध्यक्ष गोपाळ सूर्यवंशी, तुकाराम फाफाळे, सुरेन्द्र गावीत, शाहू भारती, प्रसिद्धी प्रमुख दत्ता ढाकने, कोषाध्यक्ष अजित जरे, मीडिया प्रमुख मोहन सोनटक्के, महिला अध्यक्ष उत्तरा जाधव, तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर मुंढे, सचिन बामणकर, अशोक बर्गे, राम पवार, जयेश्वर गायकवाड, अमोल मोकाशी, नाना आटोळे, खाजगी शाळा प्रमुख किरण गायकर आणि जिल्हा सचिव प्रदीप गायकवाड यांच्यासह सर्व जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकारी यांनी प्रयत्न केले.

**धोरणाविषयी प्रचंड रोष**

"जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करण्याचा निर्णय न घेता, शासन वारंवार डी सी पी एस / एन पी एस आणि आता जीपीएस सारख्या फसव्या योजना लादत आहे. तत्कालीन सरकारने उतारवयातील काठीच काढून घेतल्याने व मागील अठरा वर्षापासून सगळ्याच सरकारांनी चालढकल करण्याचे धोरण घेतल्यामुळे कर्मचारी वर्ग हवालदिल झाला आहे. कर्मचाऱ्यांमध्ये शासन धोरणाविषयी प्रचंड रोष निर्माण झाला आहे. त्यामुळे हे कर्मचारी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीतून आपला रोष व्यक्त करण्याची शक्यता नाकारता येत नाही."

संभाजी पोळ ( राज्य समन्वयक, जुनी पेन्शन संघटना )

राज्यात जुनी पेन्शन योजना बंद करून अठरा वर्षाहून अधिक कालखंड झाला असून आता अनेक कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. काही सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत. अशावेळी शासनाची डी सी पी एस / एन पी एस योजना पेन्शन विषयक लाभ देण्यासाठी पुर्णतः अपयशी ठरली आहे. त्यामुळेच या नवीन जीपीएस योजनेवर कर्मचारी विश्वास ठेवण्यास तयार नाहीत."

प्रदीप गायकवाड ( जिल्हा सचिव, जुनी पेन्शन संघटना )

# मुंबई येथील नेहरू विज्ञान केंद्राची फिरते विज्ञान प्रदर्शन अंबाजोगाईत ३१ जुलै ते १५ ऑगस्ट या काळात विविध शाळांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**

योगेश्वरी शिक्षण संस्था अंबाजोगाई संचालित पपू बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्र यांच्या पुढाकाराने मुंबई येथील नेहरू सायन्स सेंटर यांची फिरती विज्ञान प्रयोगशाळा या उपक्रमाच्या अंतर्गत अनेक शाळांमधून कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दि. ३१ जुलै ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत होणाऱ्या या कार्यक्रमांत अंबाजोगाई परिसरातील अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांना हे फिरते विज्ञान प्रदर्शन प्रत्यक्षात अनुभवता येणार आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मुंबई सारख्या ठिकाणी जाऊन विज्ञानाचे नाविन्यपुर्ण उपक्रम अनुभवता येत नाहीत. यासाठी अंबाजोगाई व परिसरात अशा प्रकारचे विज्ञानप्रसाराचे उपक्रम राबवण्यासाठी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून योगेश्वरी शिक्षण संस्था नेहमीच पुढाकार घेत असते.

मुंबई येथील नेहरू विज्ञान केंद्राकडे विविध विषयावर महाराष्ट्रभर विज्ञान प्रसार करणाऱ्या ४५ गाड्या असुन त्यापैकी एक गाडी अंबाजोगाईच्या विद्यार्थ्यांसाठी आणण्याच्या प्रक्रियेत योगेश्वरी संस्थेच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे. बीड जिल्ह्यात ही गाडी पहिल्यांदाच येत आहे. यासाठी मुंबईच्या नेहरू विज्ञान केंद्राचे संचालक उमेशकुमार रस्तोगी आणि शिक्षण अधिकारी डी.एस. धार्मिक यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

या गाडीत ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी




स्वास्थविज्ञान व स्वच्छता याविषयीचे प्रदर्शन ठेवण्यात आले आहेत. विद्यार्थी प्रत्यक्ष गाडीत जाऊन आणि गाडीभोवती फिरून हे प्रयोग पाहू शकतील. तसेच यावेळी मनोरंजनातून आणि खेळातून विज्ञान समजून सांगणारे प्रयोग विद्यार्थ्यांना दाखवले जातील. योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या सर्व शाळांमध्ये हा उपक्रम राबवला जाणार असून त्यासोबतच सोमेश्वर कन्या व मुलांचे विद्यालय घाटनांदूर , संभाजीराव बडगीरे विद्यालय ममदापूर, महाराष्ट्र विद्यालय मोहा, आसूबाई विद्यालय मांडेखेल,खोलेश्वर विद्यालय अंबाजोगाई, विवेकानंद बालक विद्यामंदिर अंबाजोगाई अशा विविध शाळांमधील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होणार आहेत.

भविष्यात नेहरू विज्ञान केंद्राच्या विज्ञान प्रसार करणाऱ्या गाड्यांच्या सहकार्याने विविध उपक्रम राबवण्याचा संस्थेचा मानस आहे.या उपक्रमांत सहभागी होण्यासाठी इच्छुक शिक्षकांनी व शाळांनी पपू. बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्राशी जोडून घ्यावे असे आवाहन विज्ञान केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

# केज ते कानडी रस्त्याचे काम कासवगतीने दुचाकीचा प्रवास धोक्याचा तर बस सेवाही झाली



**सार्वजनिक बांधकाम उपविभाग केजच्या कार्यालयास भेट दिली असता शिपाई सोडता कोणताच कर्मचारी आढळुन आला नाही. तसेच अधिकारी, कर्मचारी यांना भ्रमरध्वनीवरून संपर्क केला असता जानून बजुन फोन उचलण्यात आला नाही. सदरील कर्मचारी हे मन मर्जीने कोणताही धाक नसल्यागत वावरत असताना दिसत आहेत. या कार्यालयातील महत्त्वपूर्ण कर्मचारी वर्गावर राजकीय हात असल्याचे तसेच सदरील कर्मचारी मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करत असल्याचे जनतेमध्ये बोलले जात आहे.**

**केज विधानसभेच्या आमदार नमिता मुंदडा यांनी कोटयावधीचे विकासकामे आणली खरी मात्र कार्यालयातील कर्मचाऱ्यापासुन ते गुत्तेदारापर्यंत टक्केवारीच्या मोहमायेत अडकली असल्यामुळे सदरील कार्यालयावर वा गुत्तेदारावर आमदारांचे अंकुश नसल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. यामुळे विधानसभेला परिवर्तन होणार असल्याचेही जनतेमध्ये तथा व्यापाऱ्यात बोलले जात आहे.**

**केज/प्रतिनिधी**

केज ते कानडी माळी या रस्त्याचे कामसध्या सुरू आहे, परंतु अत्यंत कासव गतीने हे काम सुरू आहे यामुळे वाहन चालक यांची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे. त्यांच्या जिवाला यामुळे धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने याची तातडीने दखल घेऊन संबंधित गुत्तेदारास सदरचे काम तात्काळ पुर्ण करण्याच्या सुचना द्याव्यात असी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या केज तालुका अध्यक्ष तस्लिम इनामदार यांनी केली आहे.

केज पासून काही अंतरावर कानडी रोड दुरुस्तीच्या नावाखाली खोदून टाकला आहे. त्यातच सध्या पाऊस सुरू असल्याने या रस्त्यावरुन ये जा करताना वाहनधारकांना प्रचंड कसरत करावी लागते आहे. जीव मुठीत धरून कसेबसे या ठिकाणावरून जावं लागतं, यामुळे अनेकजण तर या कामामुळे या रस्त्यावरुन येण्याचेच टाळत आहेत. बस देखील बंद झाल्या आहेत. यामुळे शाळा महाविद्यालयाचे विद्यार्थी यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. वयस्कर प्रवाशांची गैरसोय झाली आहे. रोज कोणी ना कोणी दुचाकीस्वार या ठिकाणी घसरुन पडत आहेत, म्हणून संबंधित विभागाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन संबंधित गुत्तेदारास सदरचे काम तात्काळ पुर्ण करण्याच्या सुचना द्याव्यात अन्यथा आम्ही आंदोलन करु असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या केज तालुका अध्यक्ष तस्लिम इनामदार यांनी दिला आहे.



**न्यू हॉटेल राजवीर पाली येथे उद्घाटन प्रसंगी सदिच्छा भेट व सत्कार प्रसंगी न्यू हॉटेल राजवीर चे मालक प्रकाश वीर, वंचित नेते पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर, भीमदल प्रमुख एड.धम्मानंद वाघमारे, संपादक बालाजी जगतकर, लखन वीर, विशाल वाघमारे, प्रशांत वाघमारे, आदी उपस्थित**

## एक ऑगस्टपासून जिल्ह्यात महसूल सप्ताह होणार साजरा

**बीड : प्रतिनिधी**

बीड, 29: महसूल विभागातर्फे राज्यात 01 ते 07 ऑगस्ट 2024 या कालावधीत महसूल सप्ताह साजरा होणार असून बीड जिल्ह्यातही या अंतर्गत शासनाने ठरवून दिलेल्या विविध सहा योजनाबाबत जनतेमध्ये जनजागृती आणि त्यांचे समस्या सोडवल्या जातील. एक ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्र शासन महसूल दिन म्हणून साजरा करते यानिमित्ताने महसूल विभागाशी निगडित जनतेच्या विविध अडीअडचणींना समजून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. यावर्षी महसूल दिनाचे औचित्य साधून दिनांक 01 ते 07 ऑगस्ट पर्यंत शासनाच्या विविध योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून पात्र नागरिकांनी याचा अधिकाधिक लाभ घ्यावा, यासाठी महसूल सप्ताह साजरा होणार आहे. 01 ऑगस्टला जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यालयात महसूल दिनाच्या शुभारंभ होईल. दि.01 ऑगस्ट "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना" दि 02 ऑगस्ट "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना दि. 03 ऑगस्ट "मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना" दि.04 ऑगस्ट "स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय" दि. 05 ऑगस्ट "सैनिक हो तुमच्यासाठी" दि.06 ऑगस्ट "एक हात मदतीचा -दिव्यांगांच्या कल्याणाचा" 07 ऑगस्ट रोजी महसूल सप्ताहाची सांगता कार्यक्रम होणार.

## बीड न.प.कर्मचारी नलावडे यांना तात्काळ निलंबित करा - ऍड.धम्मानंद वाघमारे



बीड/प्रतिनिधी बीड नगर पालीकेमधील नगर रचना कार्यालयामध्ये नलवडे नामक महिला कर्मचारी यांनी अर्वाच्च भाषेचा वापर करून अपमानित केले आहे. तरी संबंधित बीड न.प.कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करा. बीड नगरपालिकेमधील नगर रचना कार्यालयामध्ये कामाच्या वेळेमध्ये कर्मचारी गैरहजर होते. तसेच त्या विभागाच्या नलवडे नामक महिला कर्मारी यांना विचारणा केली असता त्यांनी "तुमचे कामे मी करत नाही तुम्हाला जे काही करायचे आहे ते तुम्ही करा आम्ही कार्यालयात असुत किंवा नसुत तुम्ही काय आमचे मालक आहात का? तुम्ही सीओंकडे जा अथवा कलेक्टर यांच्याकडे जा आम्हाला काही फरक पडत नाही" असे बोलून त्यांनी कार्यालयाच्या बाहेर हाकलून लावले व अपमानित केले असून आपण संबंधित कर्मचाऱ्यावर तात्काळ निलंबनाची कार्यवाही करावी अन्यथा दि.३१.०७.२०१४ रोजी नगर पालिका प्रशासनाच्या विरोधात भोंगळ कारभाराच्या विरोधात नगर पालिकेसमोर बेमुदत अर्धनग्न आंदोलन करण्यात येईल तरी कार्यवाही करावी अशी भीम दल प्रमुख ऍड.धम्मानंद वाघमारे यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

## श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेजची इंडस्ट्रियल व्हिजिट संपन्न थर्मल पावर स्टेशनमध्ये वीजनिर्मिती बाबत घेतली इत्यंभूत माहिती



**परळी/प्रतिनिधी**

तालुक्यातील हाळम येथे गेल्या वर्षीपासून कार्यरत असलेल्या श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेज या संस्थेच्या विद्यार्थ्यांची इंडस्ट्रियल व्हिजिट संपन्न झाली याबाबत सविस्तर माहिती अशी की श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेज हाळम येथे गेल्यावर्षीपासून कार्यरत आहे या कॉलेजमधून इलेक्ट्रिशियन, वायरमन, व सोलर टेक्निशियन सारखे विद्युत क्षेत्राशी निगडित असणारे अभ्यासक्रम शिकविले जातात त्यांच्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडावी या उद्देशाने वेगवेगळ्या औद्योगिक सहली आयोजित केल्या जातात. त्याचाच एक भाग म्हणून आशिया खंडात नावाजलेले परळी येथील औष्णिक विद्युत केंद्र येथे या विद्यार्थ्यांची "इंडस्ट्रियल व्हिजिट" संपन्न झाली यावेळी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागातील अधिकाऱ्यांनी आयटीआयच्या विद्यार्थ्यांना विद्युत निर्मिती कशी होते याबाबत सखोल माहिती दिली. तसेच यावेळी श्री वैद्यनाथ आयटीआयचे प्राचार्य पिंपळे सर ,हाके सर, दहिफळे सर, मुंडे सर व विद्यार्थी उपस्थित होते


# राम राऊत प्रतिष्ठानचे दिव्यांगासाठी केज येथे भव्य मोफत कृत्रिम हात-पाय वाटप शिबीर

**केज येथे दिव्यांग बांधवासाठी राम राऊत प्रतिष्ठानचा भव्य आरोग्य मेळावा.**

**केज/प्रतिनिधी**

रुग्ण सेवा हीच खरी ईश्वर सेवा मानमध्ये बाळगून बीड जिल्ह्यातील केज तालुक्यामध्ये राम राऊत सामाजिक प्रतिष्ठान तर्फे केज शहरातील दिव्यांग बांधवासाठी मोफत कृत्रिम हात- पाय उपकरणे वाटप शिबीर आयोजित केले आहे. हे शिबीर दि ०३ ऑगस्ट शनिवार ते ४ ऑगस्ट रविवार सकाळी १० ते सायंकाळी ४ पर्यंत असणार आहे. शिबिराचे ठिकाण शिक्षक पतसंस्था हॉल, पंचायत समिती ग्राऊंड, केज, येथे आहे. या मोफत शिबीरामध्ये प्रत्येक दिव्यांग बांधवांना राम राऊत सामाजिक प्रतिष्ठान मार्फत मोफत कृत्रिम हात-पाय उपकरणे वाटप केले जाणार आहेत. तसेच सोबत प्रतिष्ठानच्या रुग्ण सेवकांकडुन आरोग्य विषयक मार्गदर्शन ही केले जाणार आहे. या शिबीराचे आयोजक श्री. रामहरी राऊत असून ते राम राऊत सामाजिक प्रतिष्ठानचे



संस्थापक अध्यक्ष आहेत. व शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे राज्यप्रमुख ही आहेत. ते लोकप्रिय मुख्यमंत्री श्री. एकनाथ

## गरजु रुग्णांनी अवश्य लाभ घ्यावा-रामहरी राऊत

शिंदे साहेब यांचे विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ओळख महाराष्ट्रभर आहे. रामहरी राऊत हे मुळचे बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील भुमीपुत्र असून ते खुद केज तालुक्यातील असल्याने त्यांना आपल्या केज तालुक्यातील गरजु रुग्णांसाठी नेहमी त्यांना कळवळा असतो. ते वेळोवेळी केज तालुक्यात मोफत आरोग्य शिबीरे लावुन खास आपल्या भागातील लोकांची काळजी घेत असतात. रामहरी राऊत यांचे पुढील उद्दीष्ट आहे की आपल्या केज तालुक्यात यापुढे आरोग्य समस्येमुळे एकही गरीब रुग्ण आपल्या आर्थिक परिस्थिती मुळे आरोग्य बाबतीत वंचित राहु नये. तसेच प्रत्येक गरीब- गरजु रुग्ण कींवा एकही दिव्यांग बांधव खाजगी शासकीय दवाखान्याच्या अडचणी असो व बिलांच्या समस्या कुठेही तो आरोग्याच्या बाबतीत वंचित राहु नये. या करता रामहरी राऊत यांनी वेळोवेळी आपल्या केज तालुक्यात गरजु रुग्णांच्या सेवेकरता शेकडो मोफत शिबीरे आयोजित करुन त्यांच्या सेवेसाठी पुढाकार घेतला आहे. त्यांनी आरोग्य तपासणी शिबिर, मोफत औषधी, डोळ्यांच्या तपासणी, लहान मुलांसाठी मोफत तपासणी, वयोवृद्ध व्यक्ती महिला भगिनी करताही आरोग्य शिबीरे राबवली आहेत. सद्या केज सह बीड जिल्ह्यातील दिव्यांग बांधवाची संख्या जास्त असल्याने त्यांनी दिव्यांगासाठी केज शहरात दिनांक ०३ ऑगस्ट शनिवार व ०४ ऑगस्ट रविवार रोजी मोफत हात पाय उपकरणे वाटप शिबीर आयोजित केले आहे. तरी गरजु रुग्ण व दिव्यांग बांधव यांनी या शिबीराचा अवश्य लाभ घ्यावा असे राम राऊत सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्री. रामहरी राऊत यांनी प्रसिद्धीस पत्रकाद्वारे आवाहन केले आहे तरी जास्तीत जास्त दिव्यांग बांधवांनी आपले नाव नोंदणी खालील नंबर वर करुन घ्यावी असे सांगितले आहे. शिबीरात नाव नोंदणी साठी संपर्क - ८९०७७७६००४ / ९११२९१८३०२


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077